**<u>नियमित दावा क्र.६०४/२०२१</u>**
**<u>निशाणी क्रमांक ११</u>**

**<u>सरतपास वादीतर्फे वकील श्री व्ही. आर. गुंजाळ यांचे मार्फत शपथेवर सुरु</u> :-**

माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. मी कागदपत्रे यादी नि. ३ लगत नि. १५ सर्व्हे नंबर ५/1 मौजे गोडसेवाडी ७/१२ उतरा दाखल केला आहे. तसेच फेरफार नं. ४०1 मौजे गोडसेवाडी तो नि. १६ प्रमाणे आहे. तसेच प्रमाणीत साठेखत दि. २०/०४/२०1६ रोजीचे प्रमाणीत प्रत व दि. १४/०७/२०1६ रोजीचे विसारपावती प्रमाणे प्रमाणीत प्रत दखल केली आहे. त्यास वस्तू अ व ब देण्यात येते. ॲड. शिवाजीराव ताजलपुरे यांचेद्वारे दि. २७/११/२०२० रोजी प्र.वादीने पाठविलेली नोटीस मला मिळाली आहे. त्याची मुळ प्रत सदर प्रकरणात दाखल केली आहे. त्यास **नि. २०** देण्यात येते. त्यानंतर मी सदर नोटीसला ॲड. जी. आर. मेंद्रे दि. ०७/१२/२०२० रोजी उत्तर दिले. सदर उत्तर नोटीस दाखल केले आहे. सदर उत्तर नोटीसवर माझे वकीलांची सही आहे. त्यास **नि. २१** देण्यास येते. सदर नोटीस पाष्टाने पाठविली होती. सदर पोष्टाची पावतीस **नि. २२** देण्यात येते. तसेच प्र. वादीने मला दमदाटी व शिवीगाळ केली होती, त्यामुळे त्यांच्या विरुध्द संगमनेर तालुका पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली होती. त्याची अदखलपात्र गुन्हयाची नोंद दाखल केलेली आहे, त्यास **नि. २३** देण्यात येते.

**<u>प्र. वादी विरुध्द एकतर्फा आदेश असल्यामुळे उलटतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृती,

**(दि. ह. दाभाडे)**
३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
संगमनेर.

दिनांक :३०/०९/२०२४